ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख १९ ऑक्टोबर, १९५५ | अंक ४१

## विविध माहिती

**सर्पगंधा वनस्पतीची लागवड**—मध्यप्रदेश सरकारनें बस्तर भागांत व आसपास चांगल्या रीतीनें उगविणाऱ्या सर्पगंधा नामक औषधी वनस्पतीची लागवड आपल्या मालकीच्या कांहीं जमिनींत करण्याचें ठरविलें आहे. ही वनस्पती रक्तदाब व नसांचे विकार ह्यांच्यावर फार गुणकारी आहे. अजूनपर्यंत ती फक्त भारतांतच सांपडत असल्यामुळें, भारतीय सरकारनें तिच्या निर्यातीवर बंधनें घातलीं आहेत.

**मद्रासमधील प्राणिसंग्रहालय**—मद्रास येथील प्राणिसंग्रहालयाचा शतसांवत्सरिक समारंभ साजरा करण्यांत येणार आहे. त्याप्रसंगीं रशिआंतून कांहीं प्राणी पाठविण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं दोन प्राणी दिल्लीला येऊन दाखल झाले आहेत. पैकीं एक हिमप्रदेशांतील पांढरें अस्वल असून दुसरा त्याच जातीचा पण अतिशय खाद्राड असा प्राणी आहे.

**भूमिहीन मजुरांची परिस्थिति**—पहिली पंचवार्षिक योजना आणि इतर विकासयोजना ह्यांचा भूमिहीन मजुरांच्या परिस्थितीवर काय परिणाम झाला आहे, तें अजमावण्यासाठीं भारतीय सरकारनें चौकशी करण्याचें ठरविलें आहे. भारताचे मजूरमंत्री श्री. खंडूभाई देसाई ह्यांनीं ही माहिती एका प्रसंगीं जाहीर केली.

**कोयना नदीवर नवा पूल**—पाटण तालुक्यांतील नाडे ह्या ठिकाणीं कोयना नदीवर बांधण्यांत येणाऱ्या पुलाचें व घेनेवाडी ते नाडे ह्या रस्त्याचें, अशीं दोन्हीं कामें लवकरच सुरू करण्यांत येणार आहेत; दोन्हीं कामांना मिळून ७ लाख रुपये खर्च येईल. नवीन पुलामुळें कऱ्हाडहून पाटणला जावयाचा मार्ग ३५ मैलांनीं कमी होईल.

**नेपाळ-तिबेट व्यापारी करार**—नेपाळ व तिबेट ह्यांच्या दरम्यान सरहद्दीवर तांदूळ व मीठ ह्यांच्या अदलाबदलीचा व्यापार चालतो. ह्या व्यापाराच्या अटी शिथिल करण्याचें नेपाळ सरकारनें ठरविलें आहे. तिबेटचे व्यापारी नेपाळला माल पुरवितात व त्याच्या बदला नेपाळमधून तांदूळ घेऊन जातात. नेपाळ मिठाच्या बदला आतां वजनानें पूर्वीपेक्षा दुप्पट तांदूळ देणार आहे.

**मानवी शरीरांतील अस्थि**—मानवी शरीरांत जन्मण्यापूर्वी ८०६ अस्थि असतात, जन्माचे वेळीं त्यांची संख्या २७० होते आणि वयांत आलेल्या माणसांत तीं २०६ च असतात. पुष्कळशीं हाडें एकमेकांशीं संलग्न झाल्यानें व वाढत्या वयाबरोबर त्यांची संख्या कमी होते. ही प्रक्रिया इतकी अचूक आहे कीं जन्मल्यापासून २१ वर्षांपर्यंत माणसाचें जीवशास्त्रीय वय केवळ कांहीं थोड्या महिन्यांच्या फरकानें बरोबर सांगतां येतें.

**विमानांतून फुकट प्रवास**—तिकिटावांचून प्रवास करणारे बहुधा मोटारी अथवा रेल्वे ह्यांतून सांपडतात. पण विमानेंहि त्यांच्या दृष्टींतून नेहमींच सुटतात असें नाहीं. मुंबईहून निघालेल्या एका विमानांत बसून एका चांभारानें मद्रासपर्यंत फुकट प्रवास केला. मुंबईला दुसऱ्याच खऱ्या प्रवाशाच्या नांवानें तो विमानांत चढला. त्याला मद्रासमध्यें अटक झाली.

**डाक्यांतील गिरणीसाठीं कापूस**—पूर्व पाकिस्तानांतील डाकेश्वरी कापडाच्या गिरणीसाठीं इजिप्तमधील लांब धाग्याचा ४ लाख रुपयांचा कापूस भारताकडून खास परवाना घेऊन रवाना करण्यांत येणार आहे. कापसाच्या अभावीं गिरणी बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. हा कापूस गिरणीला ४॥ महिनेपर्यंत पुरेल.

**कॉस्टारिका देशांत पोलादाचीं नाणीं**—मध्य अमेरिकेंतील कॉस्टारिका ह्या देशानें पोलादाचीं नाणीं वापरण्याचें ठरविलें आहे. ह्या देशांत सोन्याच्या समृद्ध खाणी आहेत. पोलादाचीं नाणीं पाडल्यास तीं चकचकीत राहतील आणि पैशासाठीं वापरण्यांत येणाऱ्या इतर धातूंच्या नाण्यांपेक्षा अधिक टिकतील म्हणून सरकारनें हा निर्णय घेतला आहे. 'कॉस्टारिका' ह्या स्पॅनिश शब्दांचा अर्थ 'वैभवसंपन्न किनारा' असा आहे.

**कोलंबो योजनेची मुदत-वाढ**—आशिआंतील राष्ट्रांना मदत करण्यासाठीं आखलेल्या कोलंबो योजनेची मुदत ३० जून अखेर संपत आहे. त्यापूर्वी मदत देणाऱ्या व घेणाऱ्या राष्ट्रांच्या संमतीनें तिची मुदत-वाढ करतां येईल. योजनेची मुदत वाढविण्याचा ठराव सिलोनतर्फे मांडण्यांत आला असून, बहुधा मुदत ४ ते ६ वर्षांनीं वाढविण्यांत येईल.

**मेवामिठाईवरील विक्री कर**—मुंबई सेल टॅक्ससंबंधीं नेमण्यांत आलेल्या सिलेक्ट कमिटीला सुरतमधील हलवायांनीं एक परिपत्रक सादर केलें आहे. मेवामिठाईवरील विक्रीकर अजिबात रद्द करण्यांत यावा किंवा तें अशक्य असल्यास दर रुपयामागें फक्त ३ पैच कर घेण्यांत यावा अशी विनंति त्यांनीं परिपत्रकांत केली आहे. मिठाईचा धंदा हा ग्रामोद्योगाच्या स्वरूपाचा आहे, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**कामगारांची विमा-योजना**—मद्रास शहर व त्यांतील उपनगरें ह्यांतील कारखान्यांतून सुमारें ५२,००० कामगार काम करतात. त्यांना आरोग्यविषयक मदत देण्याची विमा योजना ता. १४ नोव्हेंबरपासून अमलांत यावयाची आहे. कामगारांसाठीं १६ दवाखाने आणि ६० खाटांचें एक इस्पितळ ह्यांची सोय करण्यांत येणार आहे.

**तिबेटमध्यें चीनच्या नोटा**—तिबेटच्या सर्व भागांत चिनी सरकारनें आपल्या कागदी नोटा कायदेशीर चलन म्हणून व्यवहारांत आणल्या आहेत. तिबेटचें मूळचें चलन आतां हळुहळु व्यवहारांतून काढून घेतलें जाईल आणि त्याची जागा चिनी डॉलर्स व नोटा घेतील. तिबेटी चलनाचें नांव 'सँग' असें असून त्याची किंमत आतां कमी होऊं लागली आहे.

**भारतांत बनविलेला टंकलेखक**—गोदरेज कंपनीनें बनविलेला संपूर्ण देशी बनावटीचा टंकलेखक पं. नेहरूंना कंपनीतर्फे भेट म्हणून देण्यांत आला. भारतीय संशोधकांच्या प्रयत्नाचें हें फळ आहे. टंकलेखकाची किंमत ६३० रुपये आहे. गोदरेज कंपनीनें ह्या नव्या क्षेत्रांत प्रवेश करतांना सरकारच्या संरक्षणाची मागणी केलेली नाहीं. टंकलेखन-यंत्राचा लिपिपट तयार झाल्यावर कंपनी हिंदी टाइपरायटर्स तयार करणार आहे.

**रशिअन पंतप्रधानांचें स्वागत**—रशिआचे पंतप्रधान मार्शल बुल्गानिन भारताच्या आपल्या दौऱ्यांत भिलई येथें रशियाच्या पद्धतीनें काढण्यांत यावयाच्या पोलाद कारखान्याची जागा पहाणार आहेत. ह्या प्रसंगानें नागपूर कॉर्पोरेशननें त्यांचें जंगी स्वागत करण्याचें ठरविलें असून त्यासाठी २० हजार रुपयांची रक्कम खर्च करण्याचें ठरविलें आहे.

**ब्रिटनचा घड्याळाचा धंदा**— ब्रिटनमधील घड्याळांच्या धंद्याची युद्धोत्तर कालांत पुनर्घटना करण्यांत आली असून ती पूर्णपणें यशस्वी झाली आहे. आतां स्वित्झरलंडसारख्या ह्या धंद्यांत आघाडीवर असलेल्या देशांतहि ब्रिजेवर चालणारीं मोठीं घड्याळें व कांहीं सुटे भाग ब्रिटनमधून आयात करण्यांत येऊं लागले आहेत. कॉमनवेल्थ गटांतील राष्ट्रांत ब्रिटनमधील घड्याळें अधिक खपतात.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

## ऊंस व साखर हीं उभयतां

★ ॥ ये यथा मां प्रपद्यन्ते । तांस्तथैव भजाम्यहम् ॥ ★

या गीतातत्त्वाचीं आहेत. त्याप्रमाणें फलप्राप्ति देतात.

## ऊंस

नांगरटी, वावरबांधणी, निवडक बेणें, हंगामशीर लागण, वेळेवर खत-पाणी, खुरपण अशी सेवा केली म्हणजे आडसालीं ऊंस दर एकरीं ८० टन पीक देतो. सुरू व खोडवा दर एकरीं ५० टनांपेक्षा जास्त पीक देतो.

## ★ अत्यंत महत्त्वाची दक्षता ★

—१५ एप्रिलपर्यंत उसाची साखर करून घ्यावयास पाहिजे—

::: म्हणजे :::

**१०० टन उसाचीं १२० ते १३० पोतीं साखर मिळते.**

-: यंत्रसामुग्री :-

उसांत असलेली साखर शक्य तितकी जास्त काढून घेण्याकरितां व शुभ्र, दाणेदार व चमक ( Luster ) अशी साखर तयार करण्याकरितां शक्य तितकी मोठी व अद्ययावत् सुधारणेची यंत्रसामुग्री पाहिजे.

सिंडिकेटची पहिली मशिनरी २५० टनांची होती त्यावेळीं १० टक्के नफा दिला. आतां रोज १००० टन ऊंस गाळील इतकी मोठी यंत्रसामुग्री ठेवीदारांच्या आर्थिक साहाय्यानें सिंडिकेटनें चालू केली आहे.

—यामुळें—

**सिंडिकेट यापुढें वीस टक्के नफ्यांत कायम चालू राहील**

**WAIT AND SEE**

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. ७ ऑक्टोबर १९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. १९ ऑक्टोबर, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखर कारखान्यांनीं खरेदी करावयाचा ऊंस

१९५५–५६ च्या हंगामांत साखरेच्या कारखानदारानें खरेदी करावयाच्या उसाचा भाव भारत सरकारनें मणास रु. १–७–० असा ठरवून दिला आहे. हा भाव कारखाना–पोच उसाचा आहे. तथापि, कारखान्यांनीं साखरेचा जो भाव ठरविला आहे, त्या भावाशीं उसाच्या भावाची सांगड घालण्याच्या दृष्टीनें कारखान्यांनीं ऊंस खरेदी करतांना आणखी कांहीं रकम दिली पाहिजे अशी भारत सरकारची अपेक्षा आहे.

मुंबई राज्यांतील साखर कारखान्यांची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां, उसाच्या भावाची साखरेच्या भावाशीं सांगड घालण्याची पद्धत या राज्याला सोयीची नाहीं असें मुंबई सरकारनें गेल्या वर्षीच ठरविलें होतें. कारण, मुंबई राज्यांतील बहुतेक कारखान्यांचे स्वतःचे उसाचे मळे आहेत आणि त्यापासूनच मुख्यतः त्यांना उसाचा पुरवठा होतो. असे कारखाने शेतकऱ्यांकडून ऊंस खरेदी करण्यास राजी नाहींत, कारण यापुढें त्यांना किती जादा किंमत द्यावी लागेल याची त्यांना कल्पना नाहीं. म्हणून ते शेतकऱ्यांकडून ऊंस खरेदी करण्यापेक्षा स्वतःच्या मळ्यांतील उसावरच अवलंबून राहतात.

तेव्हां १९५४–५५ च्या हंगामासाठीं उसाचा भाव ठरविण्याच्या बाबतींत मुंबई सरकारनें जें धोरण स्वीकारलें होतें तेंच धोरण १९५५–५६ च्या हंगामाच्या बाबतींतहि स्वीकारण्याचें ठरविलें आहे. सरकारनें या प्रश्नाबाबत ता. ६ ऑगस्ट १९५५ रोजीं डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनशीं विचारविनिमय केला आहे आणि १९५५–५६ च्या हंगामासाठीं आतां किमान भाव ठरविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेंच हा निर्णय मान्य केल्यास या भावांत आणखी वाढ केली जाणार नाहीं असें कारखान्यांना आश्वासन देण्याचाहि सरकारनें निर्णय घेतला आहे.

सरकार व साखर कारखानदार यांनीं मान्य केलेला किमान भाव टनास ४४ रु. असा आहे. अर्थात् माल कारखान्यांत नेऊन पोचवावा लागेल. येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, हा किमान भाव असून प्रत्येक कारखान्यानें तो मान्य केला आहे. तेव्हां कांहीं कारखान्यांनीं उसाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांशीं करार करून यापेक्षा जादा भाव शेतकऱ्यांना दिला तर त्यास कोणत्याहि प्रकारें बाध येणार नाहीं.

तसेंच मुंबई सरकारनें डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएनशीं विचारविनिमय करून, ऊंस खरेदीचें पुढीलप्रमाणें नियमन करावें असेंहि ठरविलें आहे:—

(१) कारखान्याच्या १२ मैलांच्या परिसरांतून ऊंस खरेदी करण्यासाठीं कारखानदारांनीं सहकारी सोसायट्यांखेरीज इतर कोणताहि एजंट नेमूं नये. कारखान्यापासून १२ मैलांपलीकडील भागांतून ऊंस खरेदी करण्यासाठीं त्यांना एजंट नेमतां येईल. (२) खरेदी केलेल्या उसाची २५ टक्के किंमत माल पोंचल्यापासून १५ दिवसाच्या आंत दिली पाहिजे आणि उरलेली ७५ टक्के किंमत शक्य तर एक महिन्यांत द्यावी. परंतु कोणत्याहि परिस्थितींत सहा आठवड्यापेक्षा अधिक वेळ लावूं नये. तथापि १० टक्के किंमत, ऊंस पुरविण्याचा करार पुरा झाल्यावर देतां येईल. (३) कारखान्यांना जेवढा ऊंस लागतो त्या मानानें ते शक्य तितका जास्तींत जास्त ऊंस खरेदी करण्याचें कबूल करतील; आणि (४) कारखान्यांनीं १९५५–५६ च्या हंगामांत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या उसाच्या बाबतींत, साखरेच्या भावाशीं उसाच्या किंमतीशीं सांगड घालण्याचा भारत सरकारचा फॉर्म्युला लागूं करण्यांत येणार नाहीं.

---

## पाकिस्तानांतील बेकारीचें दृश्य

सध्यां चालू असलेल्या मंदीमुळें पाकिस्तानमधील आर्थिक परिस्थिति फारच बिघडलेली आहे. बेकारीच्या संख्येंत मंदीमुळें खूपच वाढ झालेली आहे. विशेषतः खालच्या थरांतील गरीब, मध्यमवर्गाला परिस्थिति अधिक जाणवत आहे. तज्ज्ञांच्या मतानें मध्यमवर्गावरील ही पकड ढिली होण्यास बराच काळ लागणार आहे. पण ह्या परिस्थितीकडे पाकिस्तानमधील कोणाचेंच लक्ष सध्यां तरी दिसत नाहीं. पश्चिम पाकिस्तानचें एकीकरण घटना तयार करणें, ह्या राजकीय प्रश्नाकडेच अधिक लक्ष देण्यांत येत आहे. गेल्या कांहीं दिवसांत पाकिस्तानच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या बातम्या आर्थिक हलाखीचा गंभीरपणा सहज लक्षांत देणाऱ्या अशा आहेत. लाहोर येथील असेंब्लीच्या इमारतीसमोर कांहीं दिवसांपूर्वी एक तरुण मनुष्य बेशुद्ध अवस्थेंत पडला. त्याला कित्येक दिवसांत खावयास मिळालेलें नव्हतें. ह्या तरुणाला इस्पितळांत पाठविण्यांत आलें. डाका येथें एका बेकार तरुणानें निराश होऊन आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाहीं. लाहोर येथील उद्योगविनिमय केंद्रावर एके दिवशीं ६,००० लोक नोकऱ्या मिळविण्याच्या उद्देशानें आपलीं नांवें नोंदविण्यास आले होते. रेल्वेच्या एका वर्कशॉपमध्यें ५३ मजुरांची जरूरी होती. त्या भाग्यवानांत आपली निवड होईल अशी सर्वांची वेडी आशा होती. गेल्या ८ महिन्यांत लयालपूर येथील उद्योग–विनिमय केंद्राकडे ६७,००० बेकारांनीं आपलीं नांवें नोंदविलेलीं आहेत. पण ह्यापैकी फारच थोड्यांना काम मिळूं शकलें. लयालपूर हें पाकिस्तानांतील सर्वांत मोठें औद्योगिक शहर आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे इतर मागासलेल्या शहरांतील नोकरीधंद्याची परिस्थितीची कल्पना करतां येईल. दरम्यान, गेल्या दोन-चार वर्षांत पाकिस्तानांतील औद्योगिक उत्पादन मात्र वाढल्याचें समजतें.

## लवाद दाव्यांतील खर्च

लेखक :— श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी.

१९२५ च्या मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यान्वयें कलम ५४ यांत नमूद केलेप्रमाणें एकादा तंटा अगर वाद निर्माण झाल्यास सदरच्या वादाचा निकाल असिस्टंट रजिष्ट्रार को. सोसायटीज् यांनीं नेमलेल्या नॉमिनीनें करावयाचा असतो. असा एकादा वाद निर्माण झाल्यास त्यास लवाद दावा अशी संज्ञा देऊन तें प्रकरण अशा रजिष्ट्रार-नॉमीनीकडे निर्णयासाठी पाठवतात. सदरचे नॉमिनिकडे लवाददाव्याचे कागदपत्र आले तर त्यांस कानू ३२ अन्वयें संबंधी पक्षकारांना कोणी प्रतिनिधी लवाद-बोर्डावर पाठवावयाचा आहे किंवा काय व पाठवणें असल्यास १५ दिवसांचे आंत कळवावे अशा स्वरूपाच्या नोटिसा काढाव्या लागतात. बहुतेक सर्व नॉमीनी अशा नोटीसा रजिष्टर्ड पोंच पावतीसह संबंधी पक्षकारांना पाठवतात. तदनंतर बोर्डाची मागणी आलेस बोर्डावर कोणता प्रतिनिधि घ्यावयाचा त्याचें नांव, पत्ता व संमतीकरतां सदरचे नॉमीनीससंबंधी पक्षकारांना पुनः नोटीसा कराव्या लागतात व त्यावरहि पोस्टेज खर्च करावें लागतें. तदनंतर बोर्ड ऑफ आर्बिट्रेटर्स अस्तित्वांत आलेवर दाव्याचीं समन्सें सर्व पक्षकारांना नियमाप्रमाणें करावीं लागतात. हीं समन्सेंहि रजिस्टर्ड पोस्टानें पाठवावीं लागतात. ह्या खर्चासाठी नॉमिनिकडे कसलीहि तरतूद केलेली नसते. ह्याशिवाय नॉमिनीनें किती रक्कम खर्च करावी हा भाग संदिग्ध स्वरूपाचा असून अशा प्रकरणांतून तक्रारी उद्भवतात असा अनुभव आहे. सहकारी खात्याकडे चौकशी करतां सदरचे खर्चाबावत एक सरकारी परिपत्रक आहे असें पाहावयास मिळतें. सदरचें परिपत्रक मोघम व संदिग्ध असून त्यावरून रजिष्ट्रारचे नॉमिनीनें खर्चासाठी, लिखाईसाठी, फॉर्म्स वगैरेसाठी किती रक्कम घ्यावी याचा स्पष्ट उल्लेख नाहीं. सदरच्या सरकारी परिपत्रकांत कारकुनी, पोस्टेज, वगैरे खर्च जास्तींत जास्त रुपये ५ पर्यंत करावा असे म्हटलेचें आहे. कांहीं वेळेस असा अनुभव येतो कीं सदरची रु. ५ ची रक्कम अगदींच अपुरी असून आलेल्या दाव्याच्या निर्णयासाठी रजिष्ट्रार नॉमीनीस पदरचे पैसे खर्च करावे लागतात. उदाहरणासाठी आपण अशा एका लवाद दाव्याच्या कामीं येणाऱ्या खर्चाचा विचार करूं. एका सभासदानें वैयक्तिक कर्ज दोन सभासद जामीन देऊन एखाद्या सहकारी बँकेकडून काढलें आहे व मूळ ऋणको व दोन जामीनदार यांनीं सदरचे बँकेस कर्जरोखा लिहून दिला आहे. कालांतरानें मूळ ऋणकोनें मुदतींत कर्जफेड न केलेमुळें वादी बँकेनें तिघांवर लवाददावा केल्यास वादी बँक धरून एकूण चार पक्षकार होतात. कानू ३२ अन्वयें चौघांना स्वतंत्र नोटिसा रजिस्टर्ड पोस्टानें पाठवाव्या लागतात. म्हणजे सुरवातीस रु. २–४–० नॉमीनीस द्यावे लागतात. यदाकदाचित् लवादबोर्डाची मागणी न आल्यास दाव्याचीं समन्सें पुनः चार पक्षकारांना रजिस्टर्ड पोस्टानें पाठवावीं लागतात. असें मिळून दाव्याला सुरवात होणेपूर्वीच निष्फळ पोस्टेजवर आणखी रु. २–४–० मिळून रु. ४–८–० खर्च होतो. ह्याशिवाय खात्याशीं पत्रव्यवहार करावा लागतो व निकालहि सर्व पक्षकारांना ते गैरहजर असल्यास पोस्टानें कळवावा लागतो. याशिवाय कधीं कधीं साक्षीदारांना समन्सें रजिष्टर्ड पोस्टानें पाठवावीं लागतात व व त्यावरहि पोस्टेजचा निराळा खर्च करावा लागतो. किरकोळ स्वरूपाच्या लवाददाव्यांत कारकुनी लिखाईचें पुष्कळच काम असतें व दाव्याचे निर्णयासाठी जेवढी मेहनत घ्यावी लागते त्याच्या चौपट लिखाईचें काम करावें लागतें. सदरच्या लिखाई-बद्दल कांहींहि मेहनताना मिळत नाहीं. कित्येक वेळां लवाद-दाव्यांत येणें रक्कम रु. १०० असल्यास लवादांस लवाद फी म्हणून फक्त रु. (२) दोन मिळतात व तीहि रक्कम दाव्याचा सर्व निकाल झालेवर मिळते. दाव्याचे कामासाठी रोजनामा करणें, कानू ३२ अन्वयें नोटीसा समन्सें करणें, साक्षीसमन्सें तयार करणें वगैरे बरींच लिखाईचीं कामें नॉमीनीस फुकटच करावीं लागतात. ह्याशिवाय जजमेंट व लवाद हुकूमनामा डुप्लीकेट करावा लागतो व दाव्याचा निकाल पक्षकारांना पोस्टानें कळवावा लागतो. अशा वेळीं खर्चाचे रु. ५ तर संपून जातातच पण नॉमीनीस कांहीं वेळां पदर खर्च करावा लागतो व निकालानंतर वर उल्लेख केले-प्रमाणें कायदेशीर फी म्हणून रु. दोन मिळतात. ही परिस्थिति पालटणें जरूर आहे. नॉमीनीस कराव्या लागणाऱ्या कामाचा विचार केल्यास खर्चाशिवाय नॉमीनीस लिखाईबद्दल जादा मेहनताना जरूर मिळाला पाहिजे व त्या दृष्टीनें सरकारी परिपत्रकांत योग्य तो बदल व्हावयास पाहिजे.

---

### बँकेच्या कर्जाचे व्यवहारांस फोटोंचें साहाय्य

अमेरिकेंतील कांहीं बँकांनीं त्यांच्याकडे गहाण असलेल्या मालमत्तेचे फोटो घेऊन ठेवण्यास प्रारंभ केला आहे. प्रत्येक मालमत्तेचा दर तीन वर्षांनीं नवा फोटो घेण्यांत येतो. ह्या मालमत्तेच्या तारणावर आणखी कर्ज मागितलें किंवा तिची विक्री करावयाची असली म्हणजे ह्या फोटोंचा उपयोग होतो. मालमत्तेची तपासणी करणें ह्या फोटोमुळें सोपें जातें; दुरुस्त्यांची आवश्यकता उघड दिसून येतें व त्याप्रमाणें मालकांना सांगतां येते. अशा रीतीनें, गहाण घेतलेल्या मालमत्तेची किंमत व परिस्थिति, ह्यावर बँकेची देखरेख रहाते. बँका स्वतःचेच फोटोग्राफर नेमतात व ते फोटो घेत हिंडतात. कॅमेऱ्यांतील गुंतवणूक व फोटो घेण्यासाठी येणारा खर्च किफायतशीर ठरतो. अशा हजारों फोटोंच्या साह्यानें, बँकांचीं कर्जे सुरक्षित राखलीं जातात.

---

### पैशाचा पुरवठा

( आकडे कोटी रुपयांचे )

| वर्ष (शेवटचा शुक्रवार) | खेळत्या चलनी नोटा | काढलेल्या नोटा | पैशाचा एकूण पुरवठा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १९३९ | २२४·४९ | २४२·९८ | ४९७·०७ |
| १९४३ | ८४०·८० | ८५०·४० | १४९०·१७ |
| १९४७ | १२२५·३६ | १२७४·३९ | २४८४·८३ |
| १९४८* | ११८८·२० | ११९८·७४ | २१९०·७१ |
| १९४९ | ११०६·४७ | ११२०·०७ | २००३·७३ |
| १९५० | ११६३·२५ | ११७३·६९ | २०८५·०० |
| १९५१ | ११४१·०९ | ११६०·३१ | २०८०·५९ |
| १९५२ | १०९२·१२ | १११२·९० | १९३८·०५ |
| १९५३ | ११२५·५२ | ११३५·८९ | १८९०·६७ |
| १९५४ | १२००·४९ | १२२६·५० | १९३६·६३ |
| १९५५ मार्च | १२७७·४९ | १२९३·०२ | १९७६·३६ |
| जून | १३१०·७९ | १३२१·०९ | १९८६·०० |

# दुसरी पंचवार्षिक योजना

## (५)

### छोट्या उद्योगधंद्यांची विभागणी

२८. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत छोट्या उद्योगधंद्यांची विभागणी पुढील तीन गटांत करण्यांत आलेली आहे. (१) छोट्या प्रमाणावरील उत्पादनानें कांहीं विशिष्ट फायदे मिळून मोठ्या उद्योगधंद्यांचा ज्यावर मोठासा परिणाम होत नाहीं असे उद्योगधंदे, (२) मोठ्या उद्योगधंद्यांचे अनुषंगिक धंदे म्हणून छोट्या प्रमाणावर संस्करणाचीं कामें ज्यांत केलीं जातात असे उद्योगधंदे, आणि (३) त्याच स्वरूपाच्या मोठ्या उद्योगधंद्यांच्या स्पर्धेस ज्यास तोंड द्यावें लागते असे उद्योगधंदे. योजनेंत अशी शिफारस करण्यांत आलेली आहे कीं, संबंधित अशा मोठ्या व छोट्या उद्योगधंद्यांचा उत्पादनाचा कार्यक्रम सारखाच असावा. या कार्यक्रमांत परिस्थितीरूप उत्पादनाचीं कांहीं क्षेत्रें राखून ठेवणें, मोठ्या उद्योगधंद्यांवर कर बसविणें, असे कांहीं भाग असतील. हातमाग धंद्यास संरक्षण देण्याचा एक अपवाद सोडल्यास, उत्पादनाचा समान कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या बाबतींत फारशी प्रगति झालेली नाहीं.

### छोट्या उद्योगधंद्यांपुढील समस्या

२९. मोठ्या उद्योगधंद्यांपुढील प्रश्नापेक्षाहि ग्रामोद्योग आणि छोटे उद्योगधंदे यांच्यासमोरील समस्या अधिक बिकट आहेत. त्या उद्योगधंद्यांत आधींच अपुऱ्या रोजगारीचें प्रमाण बरेंच आहे. तंत्रांचे बाबतींत त्यांची पातळी खालची आहे. भांडवल व तंत्र या दृष्टीनें हे उद्योगधंदे अत्यंत असंघटित आहेत. त्या धंद्यांतील उत्पादनाचा खर्च मात्र अधिक आहे. व्यापारी आणि मध्यस्थ यांच्या हातीं विक्रीची व्यवस्था असल्यानें, व उत्पादनाच्या बाबतींत तेच मार्गदर्शन करीत असल्यानें, प्रत्यक्ष उत्पादकाच्या पदरांत फारच कमी लाभ पडतो, त्याचा चरितार्थ भागून त्यास अधिक कांहीं मिळेल म्हणावें, तर कामाहि सतत असत नाहीं. समान उत्पादनाचा कार्यक्रम पुढें ठेवून केलेल्या नियोजनांतून ग्रामोद्योग व छोट्या उद्योगधंद्यांचा फार मोठ्या प्रमाणावर विकास न साधल्यास, रोजगारविषयक परिस्थितीवर आर्थिक विकासाचा परिणाम अपेक्षेपेक्षा पुष्कळच कमी होईल यांत संशय नाहीं.

### दूरगामी दृष्टिकोनाची आवश्यकता

३०. सद्यः परिस्थितीबाबतच्या या सर्व वस्तुस्थितीवरून दोन सर्वसामान्य स्वरूपाचे निष्कर्ष निघतात आणि ते लक्षांत घेणें जरूर आहे. बेकारीच्या आणि अपुऱ्या रोजगारीच्या प्रश्नाला तोंड द्यावयाचें असेल तर ग्रामीण व छोट्या उद्योगधंद्यांच्या उत्पादनांत वाढ केली पाहिजे. अद्यापि वाढ करण्यास वाव असलेल्या आणि खात्रीची बाजारपेठ असलेल्या या क्षेत्रांच्या बाबतींत एक–दोन वर्षांच्या–अवधींतच बऱ्याच गोष्टी साध्य करतां येतील. मात्र, ग्रामीण व छोट्या उद्योगधंद्यांतील आर्थिक व तांत्रिक स्वरूपाचे प्रश्न आणि या धंद्यांची योग्य संघटना हे प्रश्न मात्र कांहींसे अधिक विचार करण्याजोगे आहेत. हे प्रश्न कांहीं वर्षेपर्यंत निश्चयपूर्वक आणि सरकार देऊं शकणाऱ्या सर्व आर्थिक व तांत्रिक साधनांच्या मदतीनें सोडविण्याच्या मार्गे लागले पाहिजे. यावरून पाहतां, तातडतोबीची गरज म्हणून ग्रामीण व छोट्या धंद्यांच्या विकासास दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत 'मूलभूत भूमिका' असली पाहिजे, हें खरें असलें तरी, ती एक पांच–दहा वर्षांपुरतीच हंगामी निकड आहे असें मानणें चुकीचें ठरेल. हाच दृष्टिकोन ठेवला तर त्यामुळें अल्पमुदतीच्या स्वरूपाचेहि फायदे मिळणार नाहींत. म्हणून दुसरा निष्कर्ष हाच निघतो कीं, स्थिर व नेहमींच्या आर्थिक रचनेचा एक भाग म्हणून ग्रामीण व छोट्या उद्योगधंद्यांचा विकास साधावयाचा आहे. म्हणून त्यांची इतर ग्रामीण व नागरी अर्थव्यवस्थेशीं पूर्णतया सांगड घातली पाहिजे. अशी सांगड घातली तरच अखंड तांत्रिक व संघटनात्मक सुधारणांची निश्चिति होईल.

३१. रोजगारीच्या संधींत वाढ होण्याच्या कामीं ग्रामीण व छोट्या उद्योगधंद्यांना महत्त्वाची भूमिका बजावावयाची असली तरी आणखी बरींच वर्षे तरी निरनिराळ्या सरकारी बांधकामावरच नवीन नोकऱ्या मिळूं शकतील, या गोष्टीवर भर देणें जरूर आहे. यावरूनच पाटबंधारे व वीजयोजना, रस्ते–विकास, भूसंरक्षण आणि इतर कार्यक्रम, यांचें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील महत्त्व उघड होतें.

### जनतेचें सहकार्य आणि आर्थिक विकास

३२. राजकीय मतांचा किंवा संबंधांचा विचार न करतां, सर्व व्यक्ती व गट नागरिक या नात्यानें एकत्र कामें करीत असलेल्या विभागाची व्याप्ति वाढावी ही लोकशाहींतील आर्थिक विकासासाठीं आवश्यक अशी गोष्ट आहे. मत आणि निर्णय–स्वातंत्र्य लोकशाहींत गृहीत असून तीं आर्थिक प्रगतीस फार प्रभावीपणें हातभार लावूं शकतील. मात्र, त्याचवेळीं जनतेला एकत्र आणणारे बंध, समाजाला उपयुक्त अशा महत्त्वाच्या समान कामांत सहकार्य घडवून आणून बळकट केले पाहिजेत. समाजाला गरज असलेल्या प्रत्येक गोष्टीची तरतूद करण्याचा प्रयत्न करणें ही गोष्ट लोकशाही देशांतील सरकारच्या विचार करतां सर्वस्वीं अशक्य होईल. याचें एक कारण म्हणजे असें करावयाचें तर जनता सहजासहजीं मान्यता देणार नाहीं इतक्या मर्यादेपर्यंत कर बसवावे लागतील. शिक्षण, आरोग्यविषयक व वैद्यकीय सोयी यांसारख्या समाज सेवेच्या कार्यांत आणि स्थानिक स्वरुपाच्या इतर कामांत बऱ्याच ठिकाणीं मनुष्यबळ, अनुभव व पैसा या तिन्ही बाबतींत स्थानिक मदत मिळावी. ही स्थानिक स्वरूपाची मदत जितक्या प्रमाणांत मिळेल आणि समाजसेवेच्या कामीं तिचा उपयोग करतां येईल, तेवढ्या प्रमाणांत सरकारच्या पैशांवर कमी ताण पडेल आणि आर्थिक व सामाजिक विकासाचे परिणाम त्यामानानें अधिक अनुकूल होतील.

### श्रमदानाची व्याप्ति

३३. म्हणून, सर्व विभागांतील जनतेस व्यक्तिशः आणि स्वयंस्फूर्त संघटनांच्याद्वारें आपला योग्य तो वांटा उचलण्याची संधि मिळण्याची तरतूद व्हावी हा महत्त्वाचा हेतु कोणत्याहि क्षेत्रांतील विकासाचा, विशेषतः जनतेच्या जीवनाशीं निकट संबंध येणाऱ्या क्षेत्रांतील विकासाचा कार्यक्रम आंखतांना पुढें ठेवण्यांत यावा हीहि गोष्ट कांहीं सोपी नाहीं; कारण अधिकार आणि जबाबदारी असणाऱ्या लोकांना आपल्या अधिकारांत व जबाबदारींत इतरांना वांटेकरी होऊं देणें बऱ्याचदां सद्हेतुपूर्वक आवडत नाहीं. तथापि व्यापक उद्दिष्ट पुढें ठेवण्यांत यावें आणि प्रत्येक पातळीवरील सरकारी अधिकाऱ्यांनीं आंखलेल्या कार्यक्रमांत ते शक्यतों प्रतिबिंबित व्हावे. फक्त मार्ग दाखविला तर सार्वजनिक कल्याणाच्या कार्यांत आपला वांटा उचलण्यास सिद्ध होतील अशा असंख्य लोकांची सेवा समाजसेवेच्या यंत्रणांद्वारें आणि स्वयंस्फूर्त संस्थांद्वारें घेणें ही गोष्ट शक्य व्हावी. आतांपर्यंत

श्रमदानाचा अर्थ मुख्यत्वेंकरून ग्रामीण भागांत आपखुषीनें काम करण्याकडे लावला जात असला तरी त्याच्या अर्थाची व्याप्ति वाढविणें जरूर असून, आपल्या व्यवसायाव्यतिरिक्त किंवा उपजिविकेच्या साधनाव्यतिरिक्त प्रत्येक व्यक्तीनें क्रियाशील नागरिक या नात्यानें तो ज्या समाजांत राहतो त्या स्थानिक समाजाच्या कल्याणाच्या योजनांत कोणत्याहि स्वरूपांत उचललेल्या वांट्याचा अर्थहि श्रमदान असाच करावयास हवा. केवळ आर्थिक विकास साध्य करण्यांतच नव्हे, तर समाज रचनेला बळकटी आणण्यांत समाजाला आपण कांहीं देणें लागतों अशी भावना निर्माण करण्यांत आणि समाजवादी स्वरूपाची समाजरचना निर्माण करण्यांतहि अशा लक्षावधी व्यक्ती-व्यक्तींची किंवा गटांची मदत, हा एक उल्लेखनीय घटक आहे.

### न्यू इंडिआचे मॅ. डायरेक्टर

वरील कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरपदीं श्री. बी. के. शहा ह्यांची बोर्डानें नेमणूक केली, तिला कंपनी कायद्याच्या ८६ ज कलमाखाली मध्यवर्ती सरकारनें मंजुरी दिली आहे. नेमणूक पांच वर्षें मुदतीची असून, श्री. शहा ह्यांना दरमहा ७००० रु. पगार व दरमहा ७५० रु. सरवराई अलावन्स मिळणार आहे. पेन्शन, रजा, इत्यादींचीहि तरतूद आहे. श्री. शहा हे पूर्वी जनरल मॅनेजर व डायरेक्टर होते.


## अर्थ

—दिवाळी अंक—

दि. १६ नोव्हेंबरचा अंक दिवाळी अंक म्हणून नेहमींप्रमाणें प्रसिद्ध होईल.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ७,७५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ५,२५,००,००० |

★ या बँकेच्या सर्व शाखांवर व हिंदुस्थानांतील प्रमुख व्यापारी शहरांवर ड्राफ्टस् दिले जातात.

★ देशांतील बहुतेक प्रमुख शहरीं बिलें वसुलीची माफक दरांत व्यवस्था केली आहे.

★ हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना (पुणें), सोलापूर, नाशिक, अहमदनगर व श्रीरामपूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची सोय आहे.

चिं. वि. जोग
मॅनेजर


### दुसरी पंचवार्षिक योजना अधिक आशादायक

भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख पाटणा येथें बिहार चेंबर ऑफ कॉमर्सपुढें भाषण करतांना म्हणाले कीं, पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमापेक्षा दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची सुरुवात अधिक आशादायक वातावरणांत होत आहे. ह्यावेळीं प्रथमारंभींच आपणाजवळ कांहीं चांगल्या गोष्टी आहेत. लोकांमध्यें योजनेविषयीं अधिक आत्मीयतेची भावना निर्माण झाली आहे, हा शकून चांगला आहे. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम हा केवळ पूर्वतयारीच्या स्वरूपाचा होता. आतां कार्यक्रम पार पाडण्यासाठीं लागणारे सल्लागार तयार आहेत. त्याचप्रमाणें, बरेच तंत्रज्ञहि आतां तयार झाले आहेत. शिवाय, पहिला कार्यक्रम पार पाडतांना आपल्याला आलेला अनुभवहि पाठीशीं आहे. निरनिराळ्या राज्यांना मध्यवर्ती सरकारकडून मिळणाऱ्या मदतीबद्दल ह्यावेळीं तक्रार करण्यास जागा राहणार नाहीं, अशी आशा मला वाटते. तथापि, कोणत्या राज्याला किती मदत द्यावयाची हें ठरवितांना कांहीं अडचणी येणारच. ह्या बाबतींत शास्त्रपूत भासणारी अशी कसोटी नाहींच म्हटलें तरी चालेल. आपल्याजवळ जी साधनसंपत्ति आहे, तिचें वांटप लोकसंख्येच्या प्रमाणाला अनुसरून करण्यांत यावें असें म्हणतां येत नाहीं. निरनिराळ्या राज्यांच्या उत्पन्नाचीहि कसोटी लावतां येणार नाहीं. कारण, तसें केल्यास सध्यां अस्तित्वांत असलेली विषमता अधिकच तीव्र स्वरूपाची होईल. भारतीय सरकारनें नियंत्रक स्वरूपाचे जे कायदे केले आहेत, त्यांच्यामुळें खाजगी उद्योगधंद्यांच्या वाढीला खोडा पडला आहे, असें मला वाटत नाहीं. हे कायदे करण्यांत आले तेव्हां त्यांची वाढ खुंटेल अशी भीति बऱ्याच ठिकाणीं व्यक्त करण्यांत आली होती. पण तसें न होता खाजगी उद्योगधंदे बळकट होत आहेत.

### सामान्य व तांत्रिक शिक्षणाची सारखीच जरूरी

प्रसिद्ध इंजिनिअर श्री. एम्. विश्वेश्वरअय्या करायकुडी येथील एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें बोलतांना म्हणाले कीं, सरकारला जर सुजाण राष्ट्राची निर्मिति करावयाची असेल तर सामान्य व तांत्रिक, अशा दोन्ही शिक्षणाचा प्रसार करण्यांत आला पाहिजे. सर्व लोकांना अशा प्रकारचें शिक्षण दिल्याखेरीज योग्य अशा सांस्कृतिक जीवनाची धारणा होणार नाहीं. ज्या देशांतील ८० टक्के लोक अद्याप निरक्षर आहेत त्या देशाला सुसंस्कृत म्हणतां येणार नाहीं. रशिआ व जपान ह्या देशांनीं आपले सर्व प्रयत्न शिक्षण व उद्योगधंदे ह्या दोन बाबींवर केंद्रित केलेले होते. ह्या दोन बाबींशिवाय इतर बाबींकडे त्या देशांत मागाहून लक्ष देण्यांत आलें. माध्यमिक शिक्षणांत हिशोब ठेवण्याची प्राथमिक माहिती देण्यांत यावी. त्याचप्रमाणें व्यापार हा विषय सक्तीचा करण्यांत यावा. जे लोक उद्योगधंदे काढतात त्यांना विशेष उपयोगी नागरिक म्हणून मान्यता देण्यांत आली पाहिजे. जे नागरिक संशोधन करतील व शोध लावतील अशांची संख्या वाढली पाहिजे. शिक्षण आणि उद्योगधंदे ह्यांच्याकडे खास लक्ष पुरविल्याखेरीज राष्ट्राची प्रगति होणार नाहीं. पाश्चिमात्य देशांतील, विशेषतः अमेरिकेंतील उद्योग-धंद्यांची जी प्रगति झाली आहे, तिचें अवलोकन केल्यास आपल्या असें लक्षांत येतें कीं तेथील लोकांची जोखीम घेण्याची तयारी असते. उच्च शिक्षण आणि उद्योगधंदे ह्यांचा प्रसार सर्व देशभर योग्य तऱ्हेनें करण्यांत आला पाहिजे. सध्या उद्योगधंद्यांना पुष्कळच महत्त्व देण्यांत येत आहे कारण, त्यांच्यामुळें लोकांना रोजगार मिळतो आणि उत्पादन वाढतें. देशाच्या संरक्षणाची व्यवस्था करण्यासाठीं तांत्रिक शिक्षण आणि उद्योगधंदे यांची अतिशय गरज आहे.

## किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि., पुणें

वरील कंपनीला ३१ मार्च, १९५५ अखेर संपलेल्या वर्षीं १,९६,०४० रु. घसारा काढून ४,३८,३६० रु. नफा झाला. निव्वळ विक्रीचें उत्पन्न ५६,७६,१११ रु. आलें. ५% डिव्हिडंडसाठीं १,२०,३८२ रुपयांचा विनियोग करून ३,१७,९७८ रुपये पूर्वीचा शिलकी तोटा कमी करण्यासाठी उपयोगांत आणले गेले. अहवालाचें वर्ष कंपनीला चांगलें गेलें. किर्लोस्कर ऑइल एंजिन्स भारतांत अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत, आणि मागणी पुरविण्यासाठी उत्पादन अतिशय समाधानकारक झालें. परदेशांताहि एंजिनें जाऊं लागलीं आहेत. जर्मनी, मध्य आणि अति पूर्वेकडील देश, ह्यांत इंजनांना बाजारपेठ लाभली आहे. अहवालाचे वर्षीं कंपनीनें २० ब्रे. हॉर्सपॉवरचें एंजिन बाजारांत आणलें व त्याचें स्वागतहि चांगलें झालें आहे. ४० ब्रे. हॉर्सपॉवरचें बी–४ हें इंजन व १० ब्रे. हॉर्सपॉवरचें सिंगल सिलिंडर इंजिन लवकरच विक्रीसाठीं निघतील, त्यांना आधींच मागणी येऊन राहिली आहे. अशा रीतीनें, किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. ची स्थापना आतां सुदृढ पायावर झाली आहे. प्रस्तुत अहवालांतील विश्वासपूर्वक आशावादाइतकें अनुकूल चित्र ह्यापूर्वी कधींच दर्शविण्यांत आलें नव्हतें आणि प्रत्यक्ष व्यवहाराचे ह्यांकडे मॅनेजिंग एजंटांना व त्यांचेतर्फे कारभार पहाणारे श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांना खासच भूषणावह आहेत. ( चेअरमन : सर श्रीराम. मॅनेजिंग एजंटस् : मेसर्स किर्लोस्कर सन्स आणि कं., किर्लोस्करवाडी )

---

### अणुशक्तीचा वीज-निर्मितीसाठी उपयोग

ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री मि. अँथनी ह्यांनीं संयुक्त–राष्ट्र संघटनेच्या राजकीय समितींत अणुशक्तीच्या शांततामय वापरासंबंधी कांहीं माहिती सांगितली आहे. राजकीय समितींत ह्या विषयावर सध्यां चर्चा चालूं आहे. ते म्हणाले कीं, अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याचे कारखाने उभारण्यासाठी लागणारा भांडवली खर्च त्यांच्या वीज–उत्पादनाच्या सामर्थ्याच्या मानानें, प्रचलित वीज–केंद्रांना लागणाऱ्या भांडवली खर्चापेक्षा अजून दहा वर्षें तरी अधिक असेल ह्याबाबतें दुमत नाहीं. तथापि, तांत्रिक ज्ञानांत होणारी प्रगति लक्षांत घेतां हा खर्च कमी होईल असा अंदाज आहे. १९७५ सालीं ब्रिटनमध्यें जितकी वीज निर्माण करण्यांत येईल त्यापैकीं ४० टक्के वीज अणुशक्तीवर चालविण्यांत येणाऱ्या कारखान्यांतून निर्माण होईल असा भरंवसा वाटतो. सध्या अमेरिकेंत मामुली पद्धतीनें जी वीज निर्माण करण्यांत येत आहे तिचा उत्पादन खर्च ब्रिटनमधील उत्पादनापेक्षा बराच कमी आहे. १९७५ सालीं अमेरिकेंतील विजेच्या एकूण उत्पादनापैकीं १ ते १५ टक्केच वीज अणुशक्ति चलित कारखान्यांतून उत्पादन केली जाईल. ह्याविषयीं करण्यांत येणाऱ्या संशोधनांत ब्रिटन अतुलनीय अशा प्रकारचे प्रयत्न करीत आहे. सर्व जगाच्या दृष्टीनें विचार करतां २०० ते ३०० कोटी टन कोळशानें जितकी शक्ति उत्पन्न होऊं शकेल तितकी शक्ति २००० सालाच्या सुमारांस दर वर्षी अणु-इंधनानें निर्माण करण्यांत येऊं लागेल. अणु-विज्ञानाच्या शाखेंत एकमेकांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच्या कामांत सर्व देशांना सहकार करतां येण्यासारखा आहे. अशा सहकार्यानें जलद प्रगति होईल. परदेशांतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेतां यावें म्हणून ब्रिटन आपल्याकडून बरेच प्रयत्न करीत आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

पोस्ट बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३

पुणें जिल्ह्यांतील सर्व जनतेच्या विश्वासास पात्र झालेली ही सहकारी मध्यवर्ती बँक असून गेलीं आठ वर्षें आपले भागीदारांस ६ टक्के डिव्हिडंड देत आहे. भाग विक्री चालू आहे. बँकेचे मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची सोय आहे. पुणें शहरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय प्रथमतः आपल्या बँकेनेंच सुरूं केली. जिल्ह्यांत सर्व तालुक्याचे ठिकाणीं बँकेच्या शाखा असून त्यांचे मार्फत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. बँकेची सर्वांगीण प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| (१) दिनांक ३०–६–५५ अखेर भागांचें वसूल भांडवल | रु. | ८,३२,००० |
| (२) गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७,९६,००० |
| (३) एकूण ठेवी | रु. | १,६७,००,०००चे वर |
| (४) एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९१,२७,०००चे वर |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. | १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक
मुंबई शाखा — फोर्ट

वसूल भांडवल ४$\frac{१}{२}$ लक्ष रु.
रिझर्वस् व इतर फंडस् ५$\frac{३}{४}$ लक्ष रु.
खेळतें भांडवल सव्वा कोटीवर

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ०–८–० |
| सेव्हिंग ... ... | रु. १–८–० |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २–०–० |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३–०–० |
| २ वर्षें मुदत ... | रु. ३–४–० |
| ३ वर्षें मुदत ... | रु. ३–८–० |
| ४ वर्षें मुदत ... | रु. ३–१२–० |
| ५ वर्षें मुदत ... | रु. ४–०–० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल | रु. १२,५०,००० |

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें २
(२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४.
(३) सोलापूर (४) सांगली

★

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

★

जी. जी. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक जे. पी. — चेअरमन

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील
पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ टिळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,४६,००० |
| ठेवी | रु. १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,००00 |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५२ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

कालाबरोबर प्रगतिपथावर असलेल्या
वेस्टर्न इंडियाची विमा पॉलिसी
—म्हणजेच—
जीवनाची सुरक्षितता

★ १९५४ चे कांहीं बोलके आंकडे ★

| | |
|---|---|
| एकूण नवीन काम .... | रु. ४ कोटीवर |
| एकूण हप्त्याची आवक .... | रु. १ कोटीवर |
| एकूण आयुर्निधि .... | रु. ६ कोटीवर |
| एकूण क्लेम्स दिले .... | रु. २॥ कोटीवर |

—बोनस दरसाल दर हजारी—

रु. १२ व रु. १५
हयातींतील विमा — हयातीनंतरचा विमा

# वेस्टर्न इंडिया

## विमा कंपनी लिमिटेड, सातारा.

पुणें शाखा :—वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणें २.
—फोन नं. ३४०१—


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.